सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीसीसी २०२४/प्र.क्र.७५/१६-क**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
तारीख: २७ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ :-**

१) सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, दि. २६, फेब्रुवारी २०२४. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४.
२) सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, दि. २२ जानेवारी, २००४, महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.५८१ ए/१६-ब , दि. ०५.१२.२०१८.
५) शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.११८ ए/२०१९/१६-ब, दि. १८.०२.२०१९
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब ए, दि. ०६.०७.२०२१
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. मलोआ-११२०/प्र.क्र.१५३/का-८, दि. ०२.१२.२०२१

**प्रस्तावना :-**

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४. (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१६) अन्वये "सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग" निर्माण करण्यात आला आहे.

उक्त अधिनियमातील कलम ५ (१) नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. त्यास अनुसरून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६-ब, दि. ०६.०७.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात

विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## शासन निर्णय:-

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील अधिनियमान्वये महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी भारतीय राज्य घटनेच्या कलम १५ (४), १५(५), १६(४) व ४६ नुसार सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) ( Socially and Educationally Backward Classes) (SEBC) असा नवीन वर्ग तयार करण्यात आला असून या वर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे. सदर अधिनियमातील कलम ५ (१) अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग (एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) वर्गासाठी, राज्याच्या अखत्यारीतील लोकसेवांमधील शासकीय व निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. त्यानुसार, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०२१ / प्र.क्र.३८७/१६-ब (ए) दि. ६.७.२०२१ च्या अन्वये विहित करण्यात आलेली बिंदुनामावली सुधारीत करण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्रमांक १ येथील, अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच दि. २६ फेब्रुवारी २०२४ या दिनांकापासून शासकीय / निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीसंदर्भात सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार विहित करण्यात येत असलेल्या सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

३. सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) संदर्भाधीन क्रमांक १ येथील अधिनियमातील कलम ६ अनुसार गुणवत्तेवर नियुक्त झालेल्या सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांची संबंधित वर्गाच्या आरक्षित पदावर गणना करण्यात येऊ नये. त्यांची नियुक्ती संबंधित आरक्षण बिंदुवर दर्शवू नये. त्यांची नोंद खुल्या प्रवर्गातील बिंदुवर दर्शविण्यात यावी.

४. सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गासाठी (एसईबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १० टक्के आरक्षणाची पदे दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोटयातील संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षांकरिता सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) या वर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

तसेच, संदर्भाधीन क्रमांक ४ येथील शासन निर्णय व संदर्भाधीन क्र. ५ येथील शासन शुध्दीपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे. ईडब्ल्यूएस प्रवर्गाकरीता आरक्षणाची गणना करताना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. संदर्भ क्र. १ येथील सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ मधील कलम १८ (१) नुसार, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी म्हणजेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरू झाली असेल, अशा प्रकरणांना या अधिनियमाच्या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम, २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या, त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. यापुढे सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी सरळसेवा भरतीसाठी सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करावा. पूर्वीपासून आरक्षण लागू असलेल्या मागासप्रवर्गांचा अनुशेष असल्यास तो सरळसेवा भरतीच्यावेळी विचारात घेण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

८. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत, वरील प्रमाणे बिंदुनामावलीचा अवलंब करतांना, सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमूद करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

९. हे आदेश दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ पासून अंमलात येतील.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या http://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२४०२२७१६१९०१४४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KHALID BASHIR AHMED ARAB

Digitally signed by KHALID BASHIR AHMED ARAB
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=17b1bdae334a3efab8ffa330885658eb14b09969ecbab94b7f20dfd8f09f568b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=07B8F5561DC2748763D4033D2E7A20C2FBDCE61F9601805A936FED7CA35E329D, cn=KHALID BASHIR AHMED ARAB
Date: 2024.02.27 18:22:44 +05'30'

(खालिद बी. अरब)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मलबार हिल,मुंबई.
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय,मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद

५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य व संसद सदस्य,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव,राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३४) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३५) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३६) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३७) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

## परिशिष्ट - अ

## सरळसेवा १०० बिंदूनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७० | अराखीव |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ७२ | अराखीव |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४० | अराखीव | ७४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ४२ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | अराखीव | ४४ | अराखीव | ७८ | अराखीव |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ८० | अराखीव |
| १३ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | अराखीव | ४८ | अराखीव | ८२ | अराखीव |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ५० | अराखीव | ८४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | अराखीव | ५२ | अराखीव | ८६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | अराखीव | ५४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ८८ | अराखीव |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | अराखीव | ५६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ९० | अराखीव |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ५८ | अराखीव | ९२ | अराखीव |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ६० | अराखीव | ९४ | अराखीव |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | अराखीव | ६२ | अराखीव | ९६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | अराखीव | ६४ | अराखीव | ९८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (क)/(ब) |
| ३२ | अराखीव | ६६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | १०० | अराखीव |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | अराखीव | ६८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | | |

Post-8

## प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३%</td><td colspan="2">१,१२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३,८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७%</td><td colspan="2">२,२३,३३,५३,६३,७१,९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९ (ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग</td><td>१०%</td><td colspan="2">६,१३,२४,३६,४२,५४,६६,७४,८४,९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</td><td>१०%</td><td colspan="2">८,१६,२६,३८,४६,५६,६८,७६,८६,९८</td></tr>
<tr><td>११</td><td>अराखीव</td><td>२८%</td><td colspan="2">१०,१४,१८,२०,२२,२८,३०,३२,३४,४०,४८,४४,५०,५२,५८, ६०,६२,६४,७०,७२,७८,८०,८२,८८,९०,९२,९४, १००.</td></tr>
</table>

## परिशिष्ट – ब

## बिंदुनामावलीचा वापर करण्यासंबंधीच्या सूचना.

१. सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्गाकरिता विहीत केलेल्या १० टक्के आरक्षणाच्या तरतुदीस अनुसरुन सुधारित बिंदुनामावली तयार करताना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार विहित केलेली १०० बिंदुनामावली वापरण्यात यावी.

२. बिंदुनामावलीचा वापर करताना सेवा प्रवेश नियमातील तरतुदींनुसार संवर्गाच्या एकूण मंजूर पदसंख्येपैकी सरळसेवा कोट्यातील पदांची संख्या निश्चित करण्यात यावी.

३. दिनांक २६.०२.२०२४ रोजी भरती प्रक्रिया सुरू न झालेल्या संवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

४. प्रथम भरती वर्षाकरिताचा कालावधी दि. २६.०२.२०२४ ते दि. ३१.०८.२०२४ असा राहील. या भरतीवर्षातील सरळसेवेच्या संभाव्य रिक्त पदांची संख्या निश्चित करावी.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०२.१२.२०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निवडसूची वर्षाचा कालावधी दि. ०१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट असा राहील. (उदा. दि.०१.०९.२०२४ ते ३१.०८.२०२५)

६. बिंदुनामावली सादर करताना दि. ३१ ऑगस्ट अखेरच्या स्थितीसह सादर करावी. (उदा. दि. ३१.०८.२०२५ अखेरची बिंदुनामावली (कालावधी दि.०१.०९.२०२४ ते दि.३१.०८.२०२५)

अ) वरील प्रमाणे अ.क्र. २,३,४ नुसार एकूण प्रवर्ग निहाय सरळसेवेच्या रिक्त होणाऱ्या पदांची खालील प्रमाणे आरक्षण निश्चिती करावी.

उदा. एखाद्या संवर्गात सरळेसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्या १५० आहे. दि.२६.०२.२०२४ पर्यंत या संवर्गात ९७ पदे कार्यरत असुन ५३ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत, असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील-

### प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु

| अ. क्र. | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.जा.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र. २% | इ.मा.व. १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | २० | ११ | ४ | ४ | ५ | ३ | ३ | २८ | ७२ | १५० |
| २ | भरलेली पदे | १० | ६ | २ | ३ | ३ | २ | १ | १५ | ५५ | ९७ |
| ३ | दि.२६.०२.२०२४ रोजी भरावयाची पदे | १० | ५ | २ | १ | २ | १ | २ | १३ | १७ | ५३ |
| ४ | दि.२६.०२.२०२४ ते दि. ३१.०८.२०२४ या कालावधीतील संभाव्य भरावयाची पदे | ५ | २ | १ | ० | ० | ० | १ | १० | १० | २९ |
| ५ | एकूण भरावयाची पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | २७ | ८२ |

वरील उदाहरणात एकूण ८२ पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत.त्यावरून एसईबीसी वर्गाकरिता १० टक्के व ईडब्ल्यूएस वर्गाकरिता १० टक्के आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.

भरती वर्ष-१

(दि.२६.०२.२०२४ ते दि.३१.०८.२०२४)

### एसईबीसी करिता गणना

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | एसईबीसी करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे | या भरती वर्षात एसईबीसी प्रवर्गाकरिता उपलब्ध पदे. |
|---|---|---|
| ८२ | ८.२<br>पुर्णांकात ८ पदे | ८ |

## ईडब्ल्यूएस करिता गणना

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | ईडब्ल्यूएस करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे | या भरती वर्षात ईडब्ल्यूएस वर्गाची भरावयाची पदे. |
|---|---|---|
| ८२ | ८.२<br>पुर्णांकात ८ पदे | ८ |

**पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता ८ व ईडब्ल्यूएस करिता ८ पदे उपलब्ध होतील.**

| अक्र | तपशील | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण भरावयाची पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | ८ | ८ | ११ | ८२ |

**<u>भरती वर्ष -२</u>**

**(दि.०१.०९.२०२४ ते दि.३१.०८.२०२५)(०२.१२.२०२१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार)**

**दुसऱ्या भरती वर्षात भरण्यासाठी ४५ पदे उपलब्ध असल्यास एसईबीसी व ईडब्ल्यूएस करिता आरक्षणाची गणना खालीलप्रमाणे करावी.**

## एसईबीसी करिता गणना

| पहिल्या भरती वर्षातील एकूण भरती केलेली पदे + दुसऱ्या भरती वर्षात भरावयाची पदे | एसईबीसी करिता भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्क्यानुसार येणारी पदे | दुसऱ्या भरती वर्षात एसईबीसी करिता उपलब्ध पदे | या भरती वर्षात एसईबीसी प्रवर्गाकरिता उपलब्ध पदे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | |
| ८२+४५=१२७ | १२७ रिक्त पदांच्या १० टक्के=१२.७<br>पुर्णांकात १३ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे- पूर्वीच्या भरती वर्षात भरलेली व कार्यरत एसईबीसी पदे १३-८ =५ | ५ |

## ईडब्ल्यूएस करिता गणना

| पहिल्या भरती वर्षातील एकूण भरती केलेली पदे + दुसऱ्या भरती वर्षात भरावयाची पदे | ईडब्ल्यूएस करिता भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्क्यानुसार येणारी पदे | दुसऱ्या भरती वर्षात ईडब्ल्यूएस करिता उपलब्ध पदे | या भरती वर्षात ईडब्ल्यूएस वर्गाची भरावयाची पदे. |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | |
| ८२+४५=१२७ | १२७ रिक्त पदांच्या १० टक्के=१२.७ पुर्णांकात १३ पदे | स्तंभ २ प्रमाणे उपलब्ध पदे- पूर्वीच्या भरती वर्षात भरलेली व कार्यरत ईडब्लयुएसची पदे १३-८ =५ | ५ |

**दुसऱ्या भरती वर्षात एसईबीसी करिता ५ व ईडब्ल्यूएस करिता ५ पदे उपलब्ध होतील.**

| अक्र | तपशील | अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहिल्या भरती वर्षात भरलेली पदे | १५ | ७ | ३ | १ | २ | १ | ३ | २३ | ८ | ८ | ११ | ८२ |
| २ | दुसऱ्या भरती वर्षात भरावयाची पदे | १० | ५ | १ | ० | १ | ० | २ | ११ | ५ | ५ | ५ | ४५ |
| ३ | एकूण | २५ | १२ | ४ | १ | ३ | १ | ५ | ३४ | १३ | १३ | १६ | १२७ |

वरीलप्रमाणे आरक्षणाची गणना करताना, सामाजिक व शैक्षणिक मागासवर्गाकरिता संवर्गातील एकूण मंजूर पदांच्या १० % नुसार येणाऱ्या पदांपर्यंत पोहचेपर्यंत तसेच, आर्थिक दुर्बल घटकाकरिता संवर्गातील एकूण मंजूर पदांच्या १० % नुसार येणाऱ्या पदांपर्यंत पोहचेपर्यंत रिक्त पदांना टप्प्याटप्प्याने आरक्षण लावून पदांची गणना करणे आवश्यक राहील.

१) वरीलप्रमाणे आरक्षणाची गणना करतेवेळेस उर्वरित मागास प्रवर्गाच्या (अजा, अज, विजा- भज, विमाप्र व इमाव) आरक्षणास बाधा न आणता करावी.

२) पद भरती केलेल्या एसईबीसी उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ६ पासून नोंद करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी. तसेच, ईडब्ल्यूएस उमेदवारांची बिंदुनामावलीत बिंदु क्रमांक ८पासून नोंद प्रारंभ करून यानुसार त्यापुढे सदर वर्गासाठीच्या बिंदुंवर नोंद करावी.

३) सुधारित बिंदुनामावली तयार करताना सध्या संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या सरळसेवा कोटयातील पदसंख्या लक्षात घेऊन आरक्षण बिंदु निश्चित करण्यात यावेत. भविष्यात संवर्ग संख्येत वाढ झाल्यास, अथवा घट झाल्यास, संबंधित वर्षाची बिंदुनामावली तयार करताना सरळसेवा कोट्यातील पदसंख्येनुसार आरक्षित बिंदुंची संख्या त्या प्रमाणात जास्त अथवा कमी करण्यात यावी.

४) अपवादात्मक परिस्थितीत म्हणजेच ज्यावेळी खुल्या प्रवर्गात रिक्तता कमी असेल अशा वेळी, एसईबीसी प्रवर्गाकरिता रिक्त पदांच्या १० टक्के नुसार गणना केल्यावर तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठी, रिक्त पदांच्या १० टक्के नुसार गणना केल्यानंतर, पर्याप्त रिक्त पदे भरण्यासाठी उपलब्ध नसतील अशा परिस्थितीत एसईबीसी प्रवर्गासाठी व ईडब्ल्यूएससाठी पदे भरताना आरक्षण गणनेनुसार येणाऱ्या पदांच्या १०:१० या गुणोत्तराच्या प्रमाणात या भरतीवर्षात भरण्यात यावीत व उर्वरित पदे रिक्ततेनुसार टप्याटप्याने भरण्यात यावीत.

**उदा.एखाद्या संवर्गात सरळेसेवेच्या कोट्यातील मंजूर पदसंख्या ५४७६ आहे. दि.२६.२.२०२४ पर्यंत या संवर्गात ४९१६ पदे कार्यरत असुन ५६० पदे भरण्यासाठी उपलब्ध आहेत असे गृहित धरल्यास त्या संवर्गाचा प्रवर्गनिहाय तपशील खालील प्रमाणे राहील-**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.ज.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि.मा.प्र २% | इ.मा.व १९% | अराखीव ४८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ७१२ | ३८३ | १६४ | १३७ | १९२ | ११० | ११० | १०४० | २६२८ | ५४७६ |
| २ | भरलेली पदे | ६६८ | १२९ | १५१ | ११९ | २०३ | ७५ | १२३ | ९०० | २५४८ | ४९१६ |
| ३ | भरावयाची पदे | ४४ | २५४ | १३ | १८ | +११ | ३५ | +१३ | १४० | ८० | ५६० |
| ४ | समायोजनाकरिता पदे | ० | ० | ० | ० | +११ | ११ | +१३ | ० | १३ | ० |
| ५ | समायोजनानंतर भरावयाची पदे | ४४ | २५४ | १३ | १८ | ० | २४ | ० | १४० | ६७ | ५६० |
| ६ | दि.२६.०२.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ या कालावधीतील संभाव्य भरावयाची पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | एकूण भरावयाची पदे | ४४ | २५४ | १३ | १८ | ० | २४ | ० | १४० | ६७ | ५६० |

वरील उदाहरणात एकूण ५६० पदे भरण्यसाठी उपलब्ध आहेत. त्यावरून एसईबीसी वर्गाकरिता १० टक्के आरक्षणानुसार तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाकरिता ईडब्ल्यूएस १० टक्के आरक्षणानुसार पदे निश्चित करताना खाली दिलेल्या उदाहरणानुसार कार्यवाही करावी.

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | एसईबीसी करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे |
|---|---|
| ५६० | ५६० रिक्त पदांच्या १० टक्के =५६<br>पुर्णांकात ५६ पदे |

| पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाची पदे | ईब्ल्यूएस करिता पहिल्या भरती वर्षात एकूण भरावयाच्या पदांच्या १० टक्केनुसार येणारी पदे |
|---|---|
| ५६० | ५६० रिक्त पदांच्या १० टक्के =५६<br>पुर्णांकात ५६ पदे |

वरील उदाहणाचे अवलोकन केले असता एसईबीसी प्रवर्गाकरिता ५६ पदे व ईब्ल्यूएस करिता ५६ पदे भरण्यासाठी उपलब्ध होऊ शकतात. तथापि खुल्या प्रवर्गात केवळ ६७ निव्वळ रिक्त पदे उपलब्ध असल्याने अशा परिस्थितीत एसईबीसी प्रवर्गासाठी व ईब्ल्यूएस करिता पदे भरतांना आरक्षण गणनेनुसार येणाऱ्या पदांच्या आरक्षणाच्या टक्केवारीच्या प्रमाणशीर गुणोत्तराच्या (१०:१०) या प्रमाणात भरण्यात यावीत व उर्वरित पदे रिक्ततेनुसार पुढील भरती वर्षात अनुशेष म्हणून टप्याटप्याने भरण्यात यावीत.

**एसईबीसी करता उपलब्ध पदे-** उदा. उपलब्ध ६७ पदांच्या १०:१० या गुणोत्तरानुसार ६७ *(गुणिले ) १०/२० = ६७०/२०=३३.५ पूर्णांकात ३४ पदे एसईबीसी करिता भरण्यात यावीत. तसेच

**ईडब्ल्यूएस करिता उपलब्ध पदे-** उपलब्ध ६७ पदांच्या १०:१० या गुणोत्तरानुसार ६७ * गुणिले १०/२०= ६७०/२०=३३.५ म्हणजे ३३ पदे ईब्ल्यूएस करिता भरण्यात यावीत.

**भरती वर्ष-१**

**दि.२६.०२.२०२४ ते ३१.०८.२०२४**

**वरील गणनेनुसार पहिल्या भरती वर्षात एसईबीसी करिता ३४ पदे व ईडब्लूएस करिता ३३ पदे उपलब्ध होतील.**

| अ क्र | तपशील | अ.जा. १३% | अ.ज. ७% | वि.ज.अ ३% | भ.ज.ब २.५% | भ.ज.क ३.५% | भ.ज.ड २% | वि. मा.प्र २% | इ.मा.व १९% | एसई बीसी १०% | ईड ब्ल्यूए स १०% | अराखीव २८% | एकूण १००% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मंजूर पदे | ४४ | २५४ | १३ | १८ | ० | २४ | ० | १४० | ३४ | ३३ | ० | ५६० |

<u>प्रवर्गनिहाय आरक्षित बिंदु</u>

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>आरक्षणाची टक्केवारी</th><th colspan="2">बिंदु क्रमांक</th></tr>
<tr><td>१</td><td>अनुसूचित जाती</td><td>१३%</td><td colspan="2">१,१२, २१, २७, ३७, ४३, ५१, ६१, ६७, ७३,८१, ९१, ९७</td></tr>
<tr><td>२</td><td>अनुसूचित जमाती</td><td>७%</td><td colspan="2">२,२३,३३,५३,६३,७१,९३</td></tr>
<tr><td>३</td><td>विमुक्त जाती (अ)</td><td>३%</td><td colspan="2">३, ४१, ८३,</td></tr>
<tr><td>४</td><td>भटक्या जमाती (ब)</td><td>२.५%</td><td>४, ४७</td><td rowspan="2">९९ (ब/क)</td></tr>
<tr><td>५</td><td>भटक्या जमाती (क)</td><td>३.५%</td><td>७, ३१, ५७</td></tr>
<tr><td>६</td><td>भटक्या जमाती (ड)</td><td>२%</td><td colspan="2">११, ७७</td></tr>
<tr><td>७</td><td>विशेष मागास प्रवर्ग</td><td>२%</td><td colspan="2">१५, ८७</td></tr>
<tr><td>८</td><td>इतर मागास प्रवर्ग</td><td>१९%</td><td colspan="2">५, ९, १७, १९, २५, २९, ३५, ३९, ४५, ४९, ५५, ५९, ६५, ६९, ७५, ७९, ८५, ८९, ९५</td></tr>
<tr><td>९</td><td>सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग</td><td>१०%</td><td colspan="2">६,१३,२४,३६,४२,५४,६६,७४,८४,९६</td></tr>
<tr><td>१०</td><td>आर्थिकदृष्टया दुर्बल घटक</td><td>१०%</td><td colspan="2">८,१६,२६,३८,४६,५६,६८,७६,८६,९८</td></tr>
<tr><td>११</td><td>अराखीव</td><td>२८%</td><td colspan="2">१०,१४,१८,२०,२२,२८,३०,३२,३४,४०,४८,४४,५०,५२,५८, ६०,६२,६४,७०,७२,७८,८०,८२,८८,९०,९२,९४, १००.</td></tr>
</table>

**CSIBER Trust's**

# College of Non-Conventional Vocational Courses for Women, Kolhapur - 416004

## Internal Quality Assurance Cell

**organizes**

**One Day National Conference on "MULTIDISCIPLINARY AND SKILL-BASED EDUCATION: CHALLENGES & OPPORTUNITIES IN NEP 2020"**

**9th March 2024**

**PROGRAM SCHEDULE**

| Sr. No. | Time | Particulars |
|---|---|---|
| 1. | 9.00 am to 10.30 am | Registration and Breakfast |
| 2. | 10.30 am to 12.00 noon | Inaugural Function<br>• Chief Guest – Prof. (Dr.) Nitin Karmalkar Former VC, SPPU & Chairman Steering Committee NEP 2020 Implementation, Govt. of Maharashtra.<br>• Guest of Honor – Prof. (Dr.) M. S. Deshmukh, Director, IQAC, Shivaji University, Kolhapur. |
| 4. | 12.00 noon to 1.00 pm | **Technical Session I**<br>Keynote address by Dr. Devki Gokhale, Symbiosis School of Health Sciences, Symbiosis International University, Pune. |
| 5. | 1.00 pm to 2.00 pm | Lunch Break |
| 6. | 2.00 pm to 4.30 pm | **Technical Session II**<br>Oral Presentations |
| 8. | 4.30 pm to 5.30 pm | Valedictory Function<br>Chief Guest – Prof. (Dr.) Vishnu K. Garande, Professor of Horticulture, Zonal Agricultural Research Station, Ganeshkhind, Pune. |

**Venue:**

- **Inauguration, Technical Session I** –Radhabai Shinde Hall, 2nd Floor CSIBER, Kolhapur.
- **Breakfast & Lunch** – Basement Hall (Room No.17), CNCVCW.
- **Online Oral Presentation (Technical Session II)** - Radhabai Shinde Hall, 2nd Floor, CSIBER, Kolhapur
- **Offline Oral Presentation (Technical Session II)** – CNCVCW, Kolhapur
- **Valedictory Function** - Radhabai Shinde Hall, 2nd Floor, CSIBER, Kolhapur.

**Mrs. Shweta A. Patil**
**Organizing Secretary**

**Dr. A.R. Kulkarni**
**Chairman**

## परिशिष्ट - अ

## सरळसेवा १०० बिंदूनामावली

| बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग | बिंदु क्र. | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | ३५ | इतर मागास वर्ग | ६९ | इतर मागास वर्ग |
| २ | अनुसूचित जमाती | ३६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७० | अराखीव |
| ३ | विमुक्त जाती (अ) | ३७ | अनुसूचित जाती | ७१ | अनुसूचित जमाती |
| ४ | भटक्या जमाती (ब) | ३८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ७२ | अराखीव |
| ५ | इतर मागास वर्ग | ३९ | इतर मागास वर्ग | ७३ | अनुसूचित जाती |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४० | अराखीव | ७४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| ७ | भटक्या जमाती (क) | ४१ | विमुक्त जाती (अ) | ७५ | इतर मागास वर्ग |
| ८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ४२ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ७६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| ९ | इतर मागास वर्ग | ४३ | अनुसूचित जाती | ७७ | भटक्या जमाती (ड) |
| १० | अराखीव | ४४ | अराखीव | ७८ | अराखीव |
| ११ | भटक्या जमाती (ड) | ४५ | इतर मागास वर्ग | ७९ | इतर मागास वर्ग |
| १२ | अनुसूचित जाती | ४६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ८० | अराखीव |
| १३ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ४७ | भटक्या जमाती (ब) | ८१ | अनुसूचित जाती |
| १४ | अराखीव | ४८ | अराखीव | ८२ | अराखीव |
| १५ | विशेष मागास प्रवर्ग | ४९ | इतर मागास वर्ग | ८३ | विमुक्त जाती (अ) |
| १६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ५० | अराखीव | ८४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| १७ | इतर मागास वर्ग | ५१ | अनुसूचित जाती | ८५ | इतर मागास वर्ग |
| १८ | अराखीव | ५२ | अराखीव | ८६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| १९ | इतर मागास वर्ग | ५३ | अनुसूचित जमाती | ८७ | विशेष मागास प्रवर्ग |
| २० | अराखीव | ५४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ८८ | अराखीव |
| २१ | अनुसूचित जाती | ५५ | इतर मागास वर्ग | ८९ | इतर मागास वर्ग |
| २२ | अराखीव | ५६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ९० | अराखीव |
| २३ | अनुसूचित जमाती | ५७ | भटक्या जमाती (क) | ९१ | अनुसूचित जाती |
| २४ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | ५८ | अराखीव | ९२ | अराखीव |
| २५ | इतर मागास वर्ग | ५९ | इतर मागास वर्ग | ९३ | अनुसूचित जमाती |
| २६ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | ६० | अराखीव | ९४ | अराखीव |
| २७ | अनुसूचित जाती | ६१ | अनुसूचित जाती | ९५ | इतर मागास वर्ग |
| २८ | अराखीव | ६२ | अराखीव | ९६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग |
| २९ | इतर मागास वर्ग | ६३ | अनुसूचित जमाती | ९७ | अनुसूचित जाती |
| ३० | अराखीव | ६४ | अराखीव | ९८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| ३१ | भटक्या जमाती (क) | ६५ | इतर मागास वर्ग | ९९ | भटक्या जमाती (क)/(ब) |
| ३२ | अराखीव | ६६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागास वर्ग | १०० | अराखीव |
| ३३ | अनुसूचित जमाती | ६७ | अनुसूचित जाती | | |
| ३४ | अराखीव | ६८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | | |

7 Posts
1) SC
2) ST
3) VJ-(A)
4) NT(B)
5) OBC
6) SEBC
7) NT-C

open - 03
OBC - 01
VJ NT - 01
ST - 01
SC - 01

7 Posts

**CSIBER Trust's**
**College of Non-Conventional Vocational**
**Courses for Women, Kolhapur - 416004**
**Internal Quality Assurance Cell**
**organizes**

**One Day National Conference on "MULTIDISCIPLINARY AND SKILL-BASED EDUCATION: CHALLENGES & OPPORTUNITIES IN NEP 2020"**
**9th March 2024**

## TABLE PROGRAM FOR INAUGURAL FUNCTION

**Day: Saturday** **Date: 09/03/2024**

| Sr. No | Time | Particulars |
|---|---|---|
| 1. | 10:30 am to 10:33 am | Welcome Note by Dr. Sunita N. Dalvai (Co-Coordinator, Dept. of Commerce) |
| 2. | 10:34 am to 10:36 am | Inauguration by Chief Guest – Prof. (Dr.) Nitin Karmalkar, Former VC, SPPU & Chairman Steering Committee NEP 2020 Implementation, Govt. of Maharashtra<br>Guest of Honor – Prof. (Dr.) M. S. Deshmukh, Director, IQAC, Shivaji University, Kolhapur |
| 3. | 10:37 am to 10:47 am | Introduction of Chief Guest Prof. (Dr.) Nitin Karmalkar by Ms. Shruti Gavali (Asst. Prof., Dept of Fashion Design.)<br>Felicitation of Chief Guest by Principal Prof. (Dr.) A.R. Kulkarni (Chairman)<br>Introduction of Guest of Honor – Prof. (Dr.) M. S. Deshmukh by Ms. Shruti Gavali<br>Felicitation of Guest of Honor by Principal Prof. (Dr.) A.R. Kulkarni (Chairman) |
| 4. | 10:47 am to 10:50 am | Release of Proceeding Book of National Conference |
| 5. | 10:51 am to 10:55 am | Briefing about College & National Conference by Mrs. Shweta A. Patil (Organizing secretary, IQAC Coordinator & Head, Dept. of Food Technology) |
| 6. | 10:56 am to 11:40 am | Key note address by Chief Guest Prof. (Dr.) Nitin Karmalkar. Former VC, SPPU.<br>Chairman Steering Committee NEP 2020 Implementation, Govt. of Maharashtra |
| 7. | 11:41 am to 11:46 am | Few words by Guest of Honor – Prof. (Dr.) M. S. Deshmukh |
| 8. | 11:47 am to 11:56 am | Presidential Speech by Dr. A. R. Kulkarni (Chairman, Principal, CNCVCW, Kolhapur) |
| 9. | 11:57 am to 12:00 noon | Vote of thanks by Dr. Neelam S. Jirage (Convener, PGDND Coordinator, Dept. of Food Technology) |

| Dr. N.S. Jirage | Mrs. S.A. Patil | Prof. (Dr.) A. R. Kulkarni |
|---|---|---|
| **Convener** | **IQAC Coordinator** | **Chairman** |

छोटया संवर्गातील मागासवर्गीयांकरिता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपध्दती (सरळसेवा).

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीसीसी -२०२१/ प्र.क्र.८३५/१६-ब
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २५ फेब्रुवारी, २०२२

वाचा:-

१. शासन परिपत्रक,सामन्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८ए/१६/१६-ब, दि.२९ मे,२०१७

२. शासन निर्णय क्रमांक,सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी- २०१८/प्र.क्र. ५८१ ए /१६-ब, दि.४ जुलै,२०१९

३. शासन परिपत्रक क्रमांकः बीसीसी -२०१६/ प्र. क्र. २२८ A/१८/१६-ब ,दि. २१ ऑगस्ट,२०१९

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: बीसीसी- २०२१/प्र.क्र.३८७ /१६-ब(ए), दि. ६जुलै,२०२१

५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागा,क्रमांक: बीसीसी-२०१८/प्र.क्र.१५३/१६-ब, दि.२३ सप्टेंबर, २०२१

प्रस्तावना:-

छोट्या संवर्गामध्ये मागासप्रवर्गांची आरक्षणाची पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती कशी असावी याबाबत संदर्भ क्रमांक १ येथील दि.२९ मे,२०१७ च्या शासन परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र. ३ येथिल दि.२१ ऑगस्ट २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये सामिजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्युएस) आरक्षणासह छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांकरीता आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल पिटीशन क्रमांक ३१३२/२०२० मध्ये दिनांक ५ मे , २०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून राज्यांच्या लोकसेवा मधील शासकीय/ निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीसाठी संदर्भ क्रमांक येथील दिनांक ४ जुलै २०१९ च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली बिंदूनामावली रद्द करून दिनांक ६ जुलै २०२१ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत बिंदुनामावली विहित करण्यात आली आहे. संदर्भ क्र.६ येथील दि.२३ सप्टेंबर,२०२१ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक असलेल्या नाशिक, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, रायगड, गडचिरोली, नंदुरबार व पालघर या जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट क व गट ड संवर्गातील पदांसाठी सूधारित आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबत संदर्भ क्र. ३ येथील दि. २१ ऑगस्ट,२०१९ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना अधिक्रमित करून सुधारीत सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.त्यास अनुसरून छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील बिगर आदिवासी जिल्ह्यांमधील सरळसेवेतील छोट्या संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती सोबत जोडलेल्या अनुसूची **अ** मध्ये व अनुसूचित जमातीकरीता वाढीव आरक्षण असलेल्या पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर व गडचिरोली या आदिवासी बहुल जिल्हयांतील सरळसेवेतील छोटया संवर्गातील बिंदूनामावली मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरण्याबाबतची कार्यपद्धती सोबत जोडलेल्या अनुसूची ब,क,ड,इ व ई मध्ये विहित करण्यात आली आहे.

२. राज्यातील बिगर आदिवासी जिल्ह्यांमधील व अनुसूचित जमातीकरीता वाढीव आरक्षण असलेल्या पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर व गडचिरोली या आदिवासी बहुल जिल्हयांमधील छोटया संवर्गातील मागासवर्गीयांची आरक्षित पदे भरतांना सरळसेवेच्या बाबतीत संदर्भ क्र.१ येथील दि.२९ मे,२०१७ च्या शासन परिपत्रकातील सूचना विचारात घेऊन सोबत जोडलेल्या अनुसूची अ,ब,क,ड,इ व ई प्रमाणे कार्यवाही करावी.

३. सदर शासन निर्णय सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या सर्व विभाग प्रमुखांच्या/ नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावा.

४. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२२०२२५१७२७०५४१०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rasik Ambadas Khadse
Digitally signed by Rasik Ambadas Khadse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Rasik Ambadas Khadse
Date: 2022.02.25 17:29:10 +05'30'

**(र. अं. खडसे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.मा.सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२.मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३.मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-३२.
४.मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई-३२.
५.सर्व मा. विधानसभा सदस्य/मा.विधानपरिषद सदस्य/मा.संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
६.मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई-३५.
७.मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
८.सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
९.मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
११.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा), मुंबई.
१२. सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद), मुंबई.
१३.सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य.
१४. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.

## बिगर आदिवासी जिल्ह्यांसाठी छोट्या संवर्गातील आरक्षणाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही

### अनुसूची अ

(अजा-१३%,अज-७%,विजाअ-३%,भजब-२.५%, इमाव-१९%,भंजक-३.५%, आदुघ-१०%,भजड-२%,विमाप्र-२%, अराखीव-३८%)

| पद संख्या | ६२ % आरक्षणा नुसार आरक्षित पदे | आरक्षणाच्या टक्केवारी नुसार येणारी प्रवर्गनिहाय पदे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १ | ० | ० | आरक्षण अधिनियम कलम ३ (१) (घ) मधील तरतुदीनुसार एकाकी पदास आरक्षण लागू नाही. |
| २ | १ (१.२४) | अजा-०.२६, अज- ०.१४,विजाअ-०.०६, भजब-०.०५, इमाव-०.३८, भजक- ०.०७, आदुघ-०.२०भजड-०.०४,विमाप्र-०.०४ | प्रथम अजा,त्यानंतर बिंदुनामावलीच्या क्रमानुसार अज,विजा(अ),भज(ब),इमाव,भज(क), आदुघ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने |
| ३ | २ (१.८६) | अजा-०.३९, अज- ०.२१,विजाअ-०.०९, भजब-०.०७, इमाव-०.५७, भजक- ०.१०, आदुघ-०.३०,भजड-०.०६,विमाप्र-०.०६ | १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद बिंदुनामावलीच्या क्रमानुसार विजा(अ),भज(ब),इमाव,भज(क), आदुघ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने |
| ४ | २ (२.४८) | अजा-०.५२, अज- ०.२८,विजाअ-१२, भजब-०.१०, इमाव-०.७६,भजक-०.१४, आदुघ-०.४०,भजड-०.०८,विमाप्र-०.०८ | १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद बिंदुनामावलीच्या क्रमानुसार विजा(अ),भज(ब),इमाव,भज(क), आदुघ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने |
| ५ | ३ (३.१०) | अजा-०.६५, अज- ०.३५,विजाअ-०.१५, भजब-०.१२, इमाव-०.९५, भजक- ०.१७, आदुघ-०.५०,भजड-०.१०,विमाप्र-०.१० | १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद विजा(अ),भज(ब), ,भज(क), भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने या ३ रे पद इमाव व आदुघ या क्रमाने आळीपाळीने |
| ६ | ४ (३.७२) | अजा-०.७८, अज- ०.४२,विजाअ-१८, भजब-०.१५, इमाव-१.१४, भजक-०.२१, आदुघ-०.६०,भजड- ०.१२, विमाप्र-०.१२, | १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) व भज(ड) या क्रमाने आळीपाळीने , ३ रे पद इमाव कायमस्वरूपी , ४ थे पद आदुघ व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने |
| ७ | ४ (४.३४) | अजा-०.९१, अज-०.४९ ,विजाअ-०.२१, भजब-०.१७, इमाव-१.३३, भजक-०.२४,आदुघ-०.७०, भजड-०.१४, विमाप्र-०.१४ | १ ले पद अजा/अज आळीपाळीने, २ रे पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) व भज(ड) या क्रमाने आळीपाळीने, ३ रे पद इमाव कायमस्वरूपी , ४ थे पद आदुघ व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने |
| ८ | ५ (४.९६) | अज-१.०४, अज-०.५६ ,विजाअ-०.२४, भजब-०.२०, इमाव-१.५२, भजक-०.२८ आदुघ-०.८०,भजड-०.१६ ,विमाप्र-०.१६ | १ पद अजा कायमस्वरूपी, २ रे पद अज कायमस्वरूपी, ३ रे पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ४ थे पद इमाव कायमस्वरूपी, ५ वे पद आदुघ कायमस्वरूपी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | ६ (५.५८) | अजा-१.१७, अज- ०.६३,विजाअ-०.२७, भजब-०.२२, इमाव-१.७१, भजक- ०.३१, , आदुघ-०.९०भजड-०.१८,विमाप्र-०.१८ | १ पद अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, २ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १० | ६ (६.२०) | अजा-१.३०, अज-०.७० ,विजाअ-०.३०, भजब-०.२५, इमाव-१.९०,भजक-०.३५, आदुघ-१.०० , भजड- ०.२०, विमाप्र- ०.२० | १ पद अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, २ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| ११ | ७ (६.८२) | अजा-१.४३, अज- ०.७७,विजाअ-०.३३, भजब-०.२७, इमाव-२.०९,भजक-०.३८ , आदुघ-१.१०,भजड-०.२२ ,विमाप्र-०.२२, | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, २ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १२ | ७ (७.४४) | अजा-१.५६, अज-०.८४ ,विजाअ-०.३६, भजब-०.३०, इमाव-२.२८,भजक-०.४२ , आदुघ-१.२०,भजड- ०.२४,विमाप्र-०.२४, | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ),भज(ब), ,भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, २ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १३ | ८ (८.०६) | अजा-१.६९, अज-०.९१ ,विजाअ-०.३९, भजब-०.३२, इमाव-२.४७, भजक-०.४५ , आदुघ-१.३०,भजड-०.२६ ,विमाप्र-०.२६, | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ) व भज(ब) या क्रमाने आळीपाळीने, १ पद भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, २ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १४ | ९ (८.६८) | अजा-१.८२, अज- ०.९८,विजाअ-०.४२, भजब-०.३५, इमाव-२.६६, भजक-०.४९ , आदुघ-१.४०,भजड-०.२८ ,विमाप्र- ०.२८, | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ) व भज(ब) या क्रमाने आळीपाळीने, १ पद भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ३ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १५ | ९ (९.३०) | अजा-१.९५, अज-१.०५ ,विजाअ-०.४५, भजब-०.३७, , इमाव-२.८५, भजक-०.५२ , आदुघ-१.५०,भजड-०.३० ,विमाप्र-०.३० | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ) व भज(ब) या क्रमाने आळीपाळीने, १ पद भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ३ पदे इमाव कायमस्वरूपी, १ पद आदुघ कायमस्वरूपी. |
| १६ | १० (९.९२) | अजा-२.०८, अज- १.१२,विजाअ-०.४८, भजब-०.४०, इमाव-३.०४ , भजक-०.५६ , , आदुघ-१.६०, भजड-०.३२,विमाप्र-०.३२ | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ) व भज(ब) या क्रमाने आळीपाळीने, १ पद भज(क) ,भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ३ पदे इमाव कायमस्वरूपी, २ पदे आदुघ कायमस्वरूपी. |
| १७ | ११ (१०.५४) | अजा-२.२१, अज-१.१९ ,विजाअ-०.५१, भजब-०.४२, , इमाव-३.२३, भजक- ०.५९, , आदुघ-१.७०, भजड-०.३४, विमाप्र-०.३४ | २ पदे अजा कायमस्वरूपी, १ पद अज कायमस्वरूपी, १ पद विजा(अ), १ पद भज(क) ,१ पद भज(ब) , भज(ड) व विमाप्र या क्रमाने आळीपाळीने, ३ पदे इमाव कायमस्वरूपी, २ पदे आदुघ कायमस्वरूपी |